९८/डा.वि.


महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ६२/प्रनिप्रा/ ६८५ दिनांक : 20 AUG 2021

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी सकाळी ११:०० व दुपारी ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ३७ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, .... सदस्य
माजी कुलगुरु,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

२) श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.), .... सचिव
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य.

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ४) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. एस.के. महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई हे व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या वतीने डॉ. बी.एन. हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १:** **खालील तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | विभाग | | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १) | वैद्यकीय शिक्षण | सकाळी ११:०० वा. | बी.ए.एस.एल.पी. व बी.ओ.टी.एच. |
| | | दुपारी ०३:०० वा. | बी.पी.ओ. |

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील वैद्यकीय शिक्षण संचालनालयांतर्गत प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी., बी.ओ.टी.एच. व बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय स्वतंत्र अहवाल प्राधिकरणास सादर केले.

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी., बी.ओ.टी.एच. व बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तसेच अभ्यासक्रम / महाविद्यालय निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली व तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) प्रक्रिया शुल्काच्या संदर्भात शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असे संदर्भाधीन पत्राने कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये शासकीय महाविद्यालये वगळून, अनुदानित महाविद्यालये/संस्थांकडून प्रक्रिया शुल्क यापूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे वसूल करण्यात यावे.

२) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या सुत्रानुसार प्रक्रिया शुल्काचा पूर्ण भरणा केलेला नाही, अशा महाविद्यालयांना प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याकरिता दिनांक १५ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला, प्राधिकरणाच्या निर्देशानुसार विहित कालावधीमध्ये प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याच्या अटींवर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी., बी.ओ.टी.एच. व बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येईल.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) तसेच ज्या महाविद्यालयांनी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचा प्रवेश पडताळणी/छाननी अहवाल विहित पध्दतीने/मार्गाने प्राधिकरणास सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाने मान्यता नाकारण्यात आलेली आहे, संबंधीत महाविद्यालयांनी सदरील प्रवेश मान्यतेचा अहवाल प्राधिकरणास दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी पर्यंत सादर करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार ज्या महाविद्यालयांनी व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी. / बी.ओ.टी.एच. / बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही, तसेच या संदर्भात संबंधीत महाविद्यालयांना अधिनियम २०१५ कलम २० अन्वये रु. १ .०० लाख प्रति विद्यार्थी दंड आकारण्यात येईल, असा निर्णय प्राधिकरणाने घेतला, प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी तात्काळ कार्यवाही करावी. २१-२२
(प्रपत्र-आ)

५) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी., बी.ओ.टी.एच. व बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता सदरील अहवालांवर महाविद्यालयाच्या वतीने संबंधीत प्राचार्य अथवा राजपत्रित अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करणे क्रमप्राप्त ठरते, परंतू असे झालेले दिसून येत नाही, तथापि सदरील प्रकरणी संचालनालयाने दखल घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच संचालनालयाच्या अहवालामध्ये खुल्या संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नावापुढे 'Common' असा संवर्ग दर्शविलेला आहे. तथापि, विहित नियमानुसार संचालकांनी या पुढे 'Open' असा संवर्ग दर्शविण्याबाबत निर्देश देण्यात आले.

६) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांनी सादर केलेल्या महाविद्यालय/अभ्यासक्रमनिहाय अहवालानुसार राज्यातील अनुदानित, खाजगी व विनाअनुदानित व्यावसायिक प्रथम वर्ष पदवी बी.ए.एस.एल.पी., बी.ओ.टी.एच. व बी.पी.ओ. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत अशा प्रवेशांना खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरती मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. (प्रपत्र-ब). २५-३०

१. ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्राधिकरणास "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे.
२. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या छाननी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशामध्ये त्रुटी नाहीत.
३. अनिवासी भारतीय / व्यवस्थापन / संस्थात्मक कोटयातून अनिवासी भारतीय म्हणून प्रवेशित झालेले विद्यार्थी वगळून
४. अधिनियम, २०१५ च्या कलम ९(५)(एक) च्या तरतुदींची पुर्तता केली नसल्याबाबतचा खुलासा सादर करणे बंधनकारक राहिल.
५. ज्या महाविद्यालयांनी (शासकीय महाविद्यालये वगळून) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क भरणा केलेले नाही किंवा २) पूर्ण रक्कम अदा केलेली नाही अशा महाविद्यालयांनी विहित केलेले प्रक्रिया शुल्काची पूर्ण रक्कम दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी पर्यंत भरणा करणे बंधनकारक राहील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

६. संचालनालयाच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी दर्शविलेली आहे अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरण मान्यता नाकारलेली आहे.

प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०१९-२०) कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

अ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार ज्या महाविद्यालयांनी मध्ये व्यावसायिक पदवी बी.ए.एस.एल.पी. / बी.ओ.टी.एच. / बी.पी.ओ. या अभ्यासक्रमास प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांना नीट-युजी-सीईटी-२०२० मध्ये Negative गुण मिळालेले आहेत, अशा प्रवेशास प्राधिकरणाने मान्यता नाकारलेली आहे, तसेच संबंधीत अभ्यासक्रमास इयत्ता १२ मधील फिजीक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या विषयांतील एकुण गुणांची किमान मर्यादा असणे आवश्यक असल्याचे प्राधिकरणाची धारणा आहे, सबब या संदर्भात संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शासनाद्वारे उचित मार्गदर्शन प्राधिकरणास त्वरीत सादर करावे.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, तसेच सद्यस्थितीमध्ये उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या संक्रमणामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच तांत्रिक अडचणीमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता प्राधिकरणास ऑनलाईन पोर्टल उपलब्ध नसताना अल्प कालावधीमध्ये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १४/८/२१

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

# प्रपत्र-अ

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांचा तपशीलखालील प्रमाणे.

**Course - B.O.Th.**

| Sr. No. | College code | Name of College/Institute | Processing Fees Paid (Y/N) | No. of Students | | | Verification Report of Directorate | | | Remarks, if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Total Seats | Total admitted | Total Vacant | Recommended for approval | Not Recommended for approval | Vacant | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |
| 1. | 7101 | GS OT, MUMBAI | Yes | 40 | 40 | 0 | 0 | 0 | 0 | Report not submitted |
| **TOTAL :** | | | | **40** | **40** | **0** | **0** | **0** | **0** | |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

प्रपत्र-ब

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २३ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अटी/शर्तींच्या अधीन राहून प्राधिकरणाची मान्यता प्रदान केलेली आहे, अशा महाविद्यालयांचा तपशील खालील प्रमाणे,-

**Course - B.A.S.L.P.**

| Sr. No. | College code | Name of College/Institute | Processing Fees Paid (Y/N) | No. of Students | | | Verification Report of Directorate | | | No. of admissions provisionally approved by the Authority | Remarks, if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Total Seats | Total admitted | Total Vacant | Recommended for approval | Not Recommended for approval | Vacant | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| 1. | 8101 | AYJNIHH BASLP, MUMBAI **(Central Govt.)** | No | 15 | 15 | 0 | 15 | 0 | 0 | 15 | |
| 2. | 8102 | TN BASLP, MUMBAI | Yes | 10 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | |
| **TOTAL :** | | | | **25** | **25** | **0** | **25** | **0** | **0** | **25** | |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

**Course - B.O.Th.**

| Sr. No. | College code | Name of College/Institute | Processing Fees Paid (Y/N) | No. of Students | | | Verification Report of Directorate | | | No. of admissions provisionally approved by the Authority | Remarks, if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Total Seats | Total admitted | Total Vacant | Recommended for approval | Not Recommended for approval | Vacant | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| 1. | 7102 | TNMC OT, MUMBAI | Yes | 10 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | |
| 2. | 7103 | LTM OT SION, MUMBAI | Yes | 10 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 10 | |
| **TOTAL :** | | | | **20** | **20** | **20** | **20** | **0** | **0** | **20** | |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State



३९।

**Course - B.P.O.**

| Sr. No. | College code | Name of College/Institute | Processing Fees Paid (Y/N) | No. of Students | | | Verification Report of Directorate | | | No. of admissions provisionally approved by the Authority | Remarks, if any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Total Seats | Total admitted | Total Vacant | Recommended for approval | Not Recommended for approval | Vacant | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| 1. | 9101 | AIIMR BPO, MUMBAI **(Central Govt.)** | No | 8 | 5 | 3 | 4 | 1 | 3 | 4 | College has admitted one candidate viz. – Prasad Varsha Rambhau (AIR-225475), but this candidate has submitted EWS certificate in Central Government format. Therefore, as per NEET-UG-2020 Information Brochure candidate is not eligible for State of Maharashtra EWS Quota. Hence admission of this candidate is subject to approval of Hon'ble ARA. |
| **Total :** | | | | **8** | **5** | **3** | **4** | **1** | **3** | **4** | |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State